# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**(महानिर्मिती)**

प्लॉट क्र. जी - ९, प्रकाशगड, बांद्रे (पूर्व), ४०००५१.

संकेत स्थळ :- **www.mahagenco.in**

## <u>जाहीर सूचना</u>

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महानिर्मिती) भुसावळ औ. वि. केंद्र संच क्र. ६ (१ X ६६० मे. वॅट), या प्रकल्पाचा भांडवली खर्च तसेच अंतिम वीज दर निश्चितीकरणासाठी सादर केलेल्या याचिकेवर सूचना / अभिप्राय मागवणेबाबत. (प्रकरण क्रमांक १९५/२०२५)**

१. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (महानिर्मिती) ने भुसावळ औ. वि. केंद्र, संच क्र.६ (१x ६६० मे.वॅट), या प्रकल्पाचा भांडवली खर्च तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता एकूण महसुलाची आवश्यकता व वीज दर निश्चितीकरण, आर्थिक वर्ष २०२४-२५ चे तात्पुरते समायोजन आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० करिता एकूण महसुलाची आवश्यकता व वीज दर याच्या मंजुरीकरिता सादर केलेल्या बहुवार्षिक वीज दर याचिकेवर आणि मा. विद्युत नियामक आयोगाकडे विद्युत अधिनियम, २००३ यातील कलम ६१ व ६२ आणि ८६ (१) (अ) (ब) व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०१९ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ च्या नुसार याचिका सादर केलेली आहे.

२. मा. आयोगाने ही याचिका १२ ऑगस्ट २०२६ रोजी दाखल करून विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ (२) च्या अंतर्गत महानिर्मितीने जाहीर सूचना प्रसिद्ध करावी व याचिकेवर अभिप्राय / हरकती मागवाव्यात असे निर्देश दिले आहेत.

३. याचिकेतील ठळक सारांश पुढीलप्रमाणे आहेत.

**तक्ता क्र १ : भुसावळ औ. वि. केंद्र, संच क्र. ६ चा भांडवली खर्च**

| तपशील | भांडवली खर्च वाणिज्यिक तत्वावर कामकाज सुरू झाल्याच्या दिनी (रुपये कोटी) | अतिरिक्त भांडवलीकरण (रुपये कोटी) | | | | | | एकूण भांडवली खर्च (रुपये कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २२-०२-२०२५ रोजी | शेष आ. व. २४-२५ | आ. व. २५-२६ | आ. व. २६-२७ | आ. व. २७-२८ | आ. व. २८-२९ | आ. व. २९-३० | |
| जमीन आणि भू -विकास | ३१.७३ | | | | | | | ३१.७३ |
| बाष्पक, चलित्र, जनित्र (बीटीजी) | ३३२५.६२ | १२.१६ | २६.८५ | २५.६७ | | | | ३३९०.३ |
| यंत्र सामग्री आणि उपकरणे (एफ जी डी) | | | | १४९.२३* | | | | १४९.२३* |
| यंत्र सामग्री व उपकरणे | | | | ४०.४३ | | | | ४०.४३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (एस सी आर ) | | | | | | | | |
| प्रारंभिक सुटेभाग | ९६.११ | १.९५ | ५५.६४ | ११.३३ | ४.८६ | | | १६९.८९ |
| बांधकाम व कार्यान्वयन पूर्व खर्च | ८९.९७ | | | | | | | ८९.९७ |
| देयक न पाठवलेला अनिश्चित वीज पुरवठा खर्च | २०३.१३ | | | | | | | २०३.१३ |
| अतिरिक्त कामे | ६३.८५ | ०.६५ | १६.१० | २९६.०० | ९९.०० | | | ४७५.६ |
| स्थापत्य कामे | - | - | - | ४.०० | ३.८५ | | | ७.८५ |
| किमतीतील तफावत | ५२७.८९ | ५.१७ | १९.७१ | ३७.०५ | १.०० | | | ५९०.८२ |
| CSR (कॉ. सा. ऊ ) | ४.५८ | | ३.३१ | ८.६१ | | | | १६.०५ |
| वरकड खर्च | ३३८.२४ | १.०७ | ७४.०६ | १५.०० | १८.०० | | | ४४६.३७ |
| सल्लागार खर्च | ९.२३ | | | | | | | ९.२३ |
| **प्रत्यक्ष खर्च** | **४,६९०.३५** | **२०.९९** | **१९५.६७** | **५८७.३२** | **१२६.७१** | **-** | **-** | **५६२१.०५** |
| बांधकामाधीन काळातील व्याज | ११२२.०३ | २.६९ | ४२.३४ | १४३.८५ | १०.३० | | | १३२१.२१ |
| **एकूण** | ५८१२.३८ | २३.६८ | २३८.०२ | ७३१.१७ | १३७.०१ | - | - | ६९४२.२५ |
| अंतिम मुदतीचा दिनांकाच्या नंतरचे अतिरिक्त भांडवलीकरण | | | | | | १८.७५ | २५.०० | ४३.७५ |
| **एकूण बेरीज** | **५८१२.३८** | **२३.६८** | **२३८.०२** | **७३१.१७** | **१३७.०१** | **१८.७५** | **२५.००** | **६९८६.००** |

* एफजीडी प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित न करता, तो 'जसा आहे तसा' (as is) स्थितीत थांबवला जाईल असे गृहीत धरून

**तक्ता क्र २:- कार्यान्वयनाचे निकष**

| **अ. क्र.** | **तपशील** | **भुसावळ औ वि केंद्र संच क्र. ६** |
|---|---|---|
| १ | पूर्ण स्थिर आकारासाठी उपलब्ध लक्ष्यांक (%) | **८५ %** |
| २ | सयंत्र भार घटक लक्ष्यांक (%) | **८५ %** |
| ३ | साहाय्यकारी ऊर्जा वापर (%) | **५.७५ %** |
| ४ | साहाय्यकारी ऊर्जा वापर (%) (उत्सर्जन नियंत्रण प्रणाली करिता) | **०.२०%** |
| ५ | केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण (कि. कॅ / युनिट) | **२१३९.०५** |
| ६ | दुय्यम इंधन-तेल वापर (मि.ली. / युनिट) | **०.५०** |
| ७ | कोळसा वाहतूक हानी (%) | **०.८० %** |

**तक्ता क्र ३ : वीजनिर्मिती खर्च आणि दर भुसावळ औ . वि. केंद्र संच क्र. ६**

| अ. क्र. | तपशील | एकक | आ. व. २४-२५ | आ. व. २५-२६ | आ. व. २६-२७ | आ. व. २७-२८ | आ. व. २८-२९ | आ. व. २९-३० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ** | **स्थापित क्षमता** | **मे. वॅट** | **६६०** | **६६०** | **६६०** | **६६०** | **६६०** | **६६०** |
| **ब** | **संचालनाचे दिवस** | **संख्या** | **३८** | **३६५** | **३६५** | **३६६** | **३६५** | **३६५** |
| **क** | **वार्षिक स्थिर आकार** | | | | | | | |
| १ | भागभांडवला वरील परतावा | रु. कोटी | १३.०२ | १३७.४१ | १५२.४४ | १६५.८९ | १६८.२८ | १६८.८९ |
| २ | दीर्घकालीन कर्जावरील व्याज | रु.कोटी | ४७.९९ | ४५५.३६ | ४६१.६४ | ४६२.२८ | ४३५.५१ | ४०४.९४ |
| ३ | घसारा | रु.कोटी | ३१.३६ | ३०६.२९ | ३२६.७४ | ३४५.०५ | ३४८.३४ | ३४८.२१ |
| ४ | संचालन व देखभाल खर्च | रु.कोटी | १२.७३ | १६८.४८ | १७६.२७ | १८४.४५ | १९२.४३ | २००.७६ |
| ५ | पाणी खर्च | रु.कोटी | ०.३९ | ४५.५१ | ५०.०६ | ६३.३० | १३७.४४ | २२८.२२ |
| ६ | खेळत्या भांडवलावरील व्याज | रु.कोटी | १२.७५ | ६१.८७ | ६८.५२ | ७१.४५ | ७३.९९ | ७६.५१ |
| ७ | इतर खर्च | रु.कोटी | २.६८ | ३९.६९ | ४३.६६ | ४८.०३ | ५२.८३ | ५८.११ |
| | ग्रिडचे लवचिक कामकाज - प्रशिक्षण खर्च | रु.कोटी | - | ०.०६ | ०.२८ | ०.२८ | ०.२८ | ०.२२ |
| ८ | (वजा) वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न | रु.कोटी | ०.१० | १.०६ | १.११ | १.१७ | १.२३ | १.२९ |
| | **एकूण वार्षिक स्थिर आकार** | रु.कोटी | **१२०.८४** | **१२१३.६०** | **१२७८.४९** | **१३३९.५६** | **१४०७.८५** | **१४८४.५८** |
| **ड** | **ऊर्जा आकाराचा दर** | रु / युनिट | **३.२४९** | **३.५८०** | **३.४५६** | **३.५६४** | **३.६७१** | **३.७८१** |

४. याचिकेचा तपशीलवार दस्तऐवज आणि कार्यकारी सारांश महानिर्मितीच्या https://www mahagenco.in/ या संकेतस्थळावर, तसेच आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर (मोफत) डाउनलोड करण्यायोग्य स्वरूपात उपलब्ध आहेत.

५. खालील दस्तऐवजांच्या प्रती महानिर्मिती कंपनीच्या नमूद केलेल्या कार्यालयात लेखी विनंती केल्यास मिळू शकतील-

अ) प्रस्तावाचा कार्यकारी सारांश (इंग्रजी किंवा मराठीत), विनामुल्य.

ब) याचिकेचा तपशीलवार दस्तावेज (इंग्रजी मध्ये), सीडी/ पेन ड्राइव सहित (एकूण रु.१५०/- रोखीने अथवा “Maharashtra State Power Generation Company Limited” Payable at Mumbai यांच्या नावाने देय होणाऱ्या धनाकर्ष द्वारे प्रदान केल्यास.)

क) याचिकेचा तपशीलवार दस्तावेज (इंग्रजी मध्ये) (एकूण रु.१००/- प्रदान केल्यास.)

ड) याचिकेचा तपशीलवार दस्तावेज सीडी/ पेन ड्राइव स्वरूपात (इंग्रजी मध्ये) (एकूण रु.५०/ प्रदान केल्यास.)

**मुख्य कार्यालय :**

**मुख्य अभियंता,**
**नियामक आणि वाणिज्यिक विभाग,**
**म. रा. वीज निर्मिती कंपनी मर्यादित,**
**३ रा मजला, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१**

**इतर कार्यालये :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य अभियंता,<br>वायुविद्युत केंद्र,<br>बोकडवीरा,<br>पोस्ट-उरण, जिल्हा रायगड-४००७०२,<br>एसटीडी कोड (०२२)<br>फोन नं.२७२२२२८५ | मुख्य अभियंता,<br>चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, उर्जा भवन,<br>पोस्ट- उर्जा नगर, जिल्हा चंद्रपूर-४४२४०४,<br>एसटीडी कोड (०७१७२)<br>फोन नं. २२०१५५-५९ | मुख्य अभियंता,<br>कोराडी औष्णिक विद्युत केंद्र,<br>उर्जा भवन, प्रशासकीय इमारत,<br>पोस्ट-कोराडी, जिल्हा नागपूर, -४४११११,<br>एसटीडी कोड (०७१०९)<br>फोन नं. २६२१४१-४६ |
| मुख्य अभियंता,<br>खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र,<br>पोस्ट- खापरखेडा,<br>जिल्हा नागपूर-४४११०२,<br>एसटीडी कोड (०७११३),<br>फोन नं. २६८१६७-७० | मुख्य अभियंता,<br>परळी औष्णिक विद्युत केंद्र,<br>पोस्ट- परळी वैजनाथ, जिल्हा बीड-४३१५२०,<br>एसटीडी कोड (०२४४६),<br>फोन नं. २२२३५७ - ६० | मुख्य अभियंता,<br>भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र,<br>दीपनगर, भुसावळ, जिल्हा जळगाव-४२५३०७,<br>एसटीडी कोड (०२५८२),<br>फोन नं. २५००१२ /८४ |
| मुख्य अभियंता,<br>नाशिक औष्णिक विद्युत केंद्र,<br>प्रशासकीय इमारत,<br>पोस्ट- एकलहरे, जिल्हा नाशिक-४२२१०५,<br>एसटीडी कोड (०२५३),<br>फोन नं.२८१०२९१ -९९ | मुख्य अभियंता,<br>पारस औष्णिक विद्युत केंद्र,<br>विद्युत नगर,<br>पोस्ट- पारस, जिल्हा अकोला-४४४१०९,<br>एसटीडी कोड (०७२५७),<br>फोन नं.२३४४६५-६६ | अधिक्षक अभियंता (निर्मिती),<br>लघु जलविद्युत मंडळ,<br>प्लॉट न.१०६, ५ वा मजला,<br>प्रकाश भवन, सेनापती बापट मार्ग,<br>पुणे, जिल्हा पुणे-४११०१६,<br>एसटीडी कोड (०२०),<br>फोन नं. २५६३७६१० |
| उप मुख्य अभियंता,<br>(इंधन व्यवस्थापन –३ ),<br>विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर,<br>जिल्हा नागपूर-४४००१३,<br>एसटीडी कोड (०७१२),<br>फोन नं.२५९११५१ | | |

६. महानिर्मिती कंपनीने या जाहीर सुचनेद्वारे उक्त याचिकेसंबंधात जनतेकडून सूचना आणि हरकती मागवाव्यात, असे मा.आयोगाने निर्देश दिले आहेत. या जाहीर सुचनेला प्रतिसाद देण्यासाठी ज्यांना कोणाला आपल्या हरकती सूचना सादर करावयाच्या असतील ते आपल्या लेखी हरकती / सूचना मराठी किंवा इंग्रजी भाषेत माननीय वीज नियामक आयोगाच्या संकेतस्थळावर E-public consultation या टॅबवर (www.merc.gov.in/ e-public consultation) अपलोड करू शकतात. या सुविधेचा वापर करण्यास जर काही अडचण येत असल्यास संबंधितांनी माननीय वीज नियामक आयोगाच्या कार्यालयात ८९२८०७१५२२ या संपर्क क्रमांकावर अथवा e-hearing@merc.gov.in ईमेल आय डी वर सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.०० वाजेच्या दरम्यान कामकाजाच्या दिवसांत संपर्क साधावा .

७. ज्या व्यक्तीनी E-public consultation या टॅब वर हरकती / सूचना अपलोड केलेल्या असतील, त्यांनी कोणतीही मुद्रित/छापील प्रत सादर करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीना electronic संपर्क साधने उपलब्ध नसतील त्यांनी आपल्या हरकती/सूचना छापील प्रतीत, "माननीय सचिव, महाराष्ट्र विद्‌युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई. ४००००५ किंवा फॅक्स क्र.०२२- २२१६३९७६ ई-मेल :mercindia@merc.gov.in" या पत्त्यावर व श्री.गिरीश कुमारवार, मुख्य अभियंता, नियामक आणि वाणिज्यिक विभाग, महानिर्मिती [महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी लिमिटेड], ३ रा मजला, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०००५१, ई-मेल : rcgen@mahagenco.in] यांना प्रत दिल्याच्या पुराव्यासहित आणि प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता व असल्यास ई-मेल पत्ता यांसहित पाठवाव्यात.दिनांक. ५ सप्टेंबर २०२६ ला संध्याकाळी ५ वाजेनंतर प्राप्त झालेल्या हरकती/सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच वर नमूद केलेल्या माध्यमांव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या हरकती/सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

८. दिनांक: ५ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती / सुचनेला महानिर्मिती कंपनीकडून तीन दिवसांत परंतु दिनांक: ८ सप्टेंबर २०२६ पूर्वी, उत्तरे देण्यात येतील. कंपनीतर्फे देण्यात आलेल्या उत्तरांवर आक्षेप, त्यांची प्रत्युत्तरे किंवा उत्तरे जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशिरा दिनांक: ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत दाखल करता येऊ शकतात.

९. जर प्रेषक / हरकतदार, ज्याने वरील (७) नुसार हरकती / सूचना सादर केल्या आहेत, यांस आयोगापुढील जाहीर सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याची, बोलण्याची इच्छा असल्यास त्याने ते स्पष्टपणे हरकती / सूचनेमध्ये नमूद करावे. यासाठी, वैध ई मेल आय-डी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सादर करणे अनिवार्य आहे. मा.आयोग, त्यांच्या

तारतम्यानुसार दि. १० सप्टेंबर २०२६, रोजी Video Conferencing द्वारे सकाळी ११.०० वाजता होणाऱ्या ई -जाहीर सुनावणीस उपस्थित राहण्याची व बोलण्याची संधी देऊ शकतो व त्याकरिता वेगळी सूचना दिली जाणार नाही.

१०. ई-जाहीर सुनावणीत सहभागी होणाऱ्या सर्वांनी मा. आयोगाद्वारे दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जाहीर केलेल्या "मा. आयोगासमोरील ई-सुनावणीची प्रक्रिया व त्यादरम्यान पाळावयाचे संकेत" यासंदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

**ठिकाण: मुंबई** **--सही--**

**दिनांक:१४ ऑगस्ट , २०२६** **श्री गिरीश कुमारवार**

**मुख्य अभियंता (नियामक व वाणिज्यिक विभाग)**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**